# ठाणेदार पिदुरकरसह ३ पोलिस अंमलदार निलंबित

## रेहट्यारखेडा धिंड प्रकरणात चौकशित दोषी आढळल्याने करवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.7 )**-चिखलदरा तालुक्यातील रेहट्याखेडा येथे आदिवासी वृध्द महिलेची धिंड काढल्याया प्रकरणात चिखलदऱ्याचे तत्कालीन ठाणेदार आनंद पिदुरकरसह तीन पोलिस अंमलदारांना निलंबित करण्यात आले. निलंबित पोलिस हवालदारांमध्ये दीपक सोनाळेकर, प्रमिला जामकर व भिमसिंग उईके यांचा समावेश आहे.



ठाणेदार आनंद पिदूरकर यां'या निलंबन आदेशावर विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी 5 फेब्रुवारी रोजीच स्वाक्षरी केली होती. त्या आदेशाची 6 फेब्रुवारी रोजी अंमलबजावणी करण्यात आली. तर तीन पोलिस अंमलदारां'या निलंबनाचे आदेश पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी गुरुवारी सायंकाळी काढले. तत्कालीन ठाणेदार आनंद पिदुरकर यां'या निलंबना'या आदेशावर 5 फेब्रुवारी रोजीच स्वाक्षरी केली. त्याप्रकरणी अन्य तीन अंमलदारांना देखील निलंबित करण्यात आले आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे( अमरावती परिक्षेत्र)

सर्वप्रथम हे प्रकरण उघडकीस आणताच संपूर्ण रा'यात खळबळ उडाली होती. त्यापूर्वी, पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी 1 फेब्रुवारी रोजी आनंद पिदुरकर यांची मुख्यालयी बदली करून त्यांना कल्याण शाखेचे प्रभारीपद दिले होते. तर, सहायक पोलिस उपनिरीक्षक रामू भिलावेकर, हवालदार दीपक सोनाळकर, भीमसिंग उईके, श्रीकांत खानंदे व प्रमिला जानकर यांना मुख्यालयी संलग्न केले होते. मात्र, इतक्या गंभीर प्रकरणात केवळ संलग्न व बदली अशी कारवाई झाल्याने आश्चर्य व्यक्त होत होते.

### काय आहे प्रकरण

रेट्याखेडा येथे 30 डिसेंबर 2024 रोजी घटने'या दिवशी पहाटे चार वाजता शौचसाठी घराबाहेर निघालेल्या 77 वर्षीय आदिवासी वृद्धेवर काही गावकऱ्यांनी जादू टोण्याचा आड घेत तिला दोरखंडाने बांधून मारहाण केली. गरम लोखंडी सळाखीचे चटके दिले, मिरचीची धुनी दिली, तोंडाला काळे फासले, माणसाचे आणि कुर्त्याचे मूत्र पाजले, एवढ्यावरही हा अघोरी प्रकार थांबला नाही. त्या वृद्धेला डोक्यावर गाठोडे घेऊन मारत गावभर दिंड काढली. याप्रकरणी 5 जानेवारी रोजी या वृध्दे'या सुनेने चिखलदरा पोलिसात तक्रार नोंदविली होती, परंतू पोलिसांनी फक्त वृध्देला मारहाण केल्याप्रकरणी तक्रारीनुसार भारतीय न्याय संहिते'या 118(1),352, 351 (2),351(3),3/5 अन्वये गुन्हे दाखल केले. मात्र याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली नव्हती. पोलिसांनी घटनास्थळी जावून कुठलीही चौकशी केली नाही. वृध्देची धिंड काढल्याचे छायाचित्र जेव्हा पुढे आले, तेव्हा जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत, याप्रकरणी अंधश्रध्दा निर्मुलन कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करुन मुख्य आरोपी माजी सरपंच तथा बडतर्फ पोलीस पाटील बाबू झापू जामुनकर (वय 45), सायबु भुऱ्या चतुर (वय 32), रामजी भूऱ्या चतुर (वय 42), साबुलाल तुंबा चतुर (वय 32, सर्व रा.रेट्याखेडा) यांना अटक केली होती.

# बांधकाम विभागासमोर कंत्राटदारांचे आंदोलन

### प्रलंबित देयके निकाली काढण्याची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** - अिमरावती जिल्हा कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने शुक्रवारी( दि.7) सार्वजनिक बांधकाम विभागासमोर एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. अमरावती जिल्हा कंत्राटदार संघटना व बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाचे पदाधिकारी व सदस्य या आंदोलनात सहभागी झाले.

अनेकदा पत्र व्यवहार करूनही मागील एक वर्षापासून कंत्राटदारांची देयके थकीत असल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे शासनाचे याकडे लक्ष वेधण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

सा.बां. खात्याच्या विविध लेखा शिर्ष अंतर्गत राज्यात प्रत्येक जिल्हयात अनेक कंत्राटदारांनी कामे केली आहे. त्यापैकी काही पूर्णावस्थेत आहे तर काही अपूर्ण आहेत. त्या विविध लेखाशिर्षांवर व विशेषत: अंदाजपत्रकीय कामावर मागील एक वर्षात अपूरा व त्रोटक निधी वाटप करण्याची पध्दत संबंधीत विभागाने वित्त विभागाच्या सहकार्याने अवलंबिली आहे.त्यामुळे कंत्राटदारांना अनेक मानसिक व शारीरीक त्रास सोसावा लागत आहे,असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

त्यामुळे अश्या परिस्थितीतून मार्ग काढून त्वरीत तोडगा काढण्याची विनंती संघटनेने केली आहे. तसेच ज्या देयकांचा प्रलंबन काळ करारनाम्यानुसार 30 दिवसापेक्षा जास्त आहे. त्यावर बँक दराप्रमाणे व्याज देण्याची मागणीही केली आहे. अन्यथा कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला.

आंदोलनात गजानन लकडे, रवींद्र गुल्हाने, गोपाल राठी, विनोद चांडक, नितीन भेटाळू, प्रकाश राऊत, प्रवीण बाजड, गजानन टेकाळे, अविनाश गुल्हाने, राजेश भोरकडे, मंगेश कडू, प्रकाश राऊत यांच्यासह मोठ्या संख्येत संघटनेचे पदाधिकारी व सदस्य कंत्राटदार सहभागी झाले होते.

# शॉर्टसर्किटमुळे भीषण आग; संपूर्ण घर जळून खाक

### तळेगाव दशासर येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**तळेगाव दशासर ( दि. 7 )** - धामणगाव रेल्वे तालुक्यातील तळेगाव दशासर येथे बुधवारी(ता. 5) वसंत चंपतराव काटकर यांच्या घराला भीषण आग लागली. प्राथमिक माहितीनुसार, ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे समजते. या दुर्घटनेत संपूर्ण घर जळून खाक झाले असून, घरातील संपूर्ण साहित्यांची राखरोगोळी झाली आहे.

आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मात्र, आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केल्यामुळे नुकसान टाळणे शक्य झाले नाही. घटनेची माहिती मिळताच धामणगाव रेल्वे येथील अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीत काटकर कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असून, जीवनावश्यक वस्तूंसह घरातील महत्त्वाची कागदपत्रे आणि साहित्यही आगीत जळाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ



व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थ व प्रशासनाकडून काटकर कुटुंबाला शक्य ती मदत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्थानिक प्रशासनाने या घटनेचा तपास सुरू केला असून, पीडित कुटुंबाला मदतीसाठी शासनाकडे शिफारस केली जाईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

# कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या गोवंशांना जीवनदान

### दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती- ( दि.7 )**- कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या सात गोवंशांची नागपुरी गेट पोलिसांनी कमेला ग्राउंड परिसरातील एका गोठ्यावर 7 फेब्रुवारी रोजी सकाळी सुटका केली. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद शरीफ मोहम्मद रशीद (65,रा. हैदरपुरा) व शेख शमी शेख मुन्शी (36, रा. पठाण चौक) अशी आरोपींची नावे आहेत. कमेला ग्राउंड परिसरातील शेख शमी शेख मुन्शी याच्या गोठ्यामध्ये कत्तलीच्या उद्देशाने गोवंशांना डांबून ठेवण्यात आल्याची माहिती नागपुरी गेट पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी या गोठ्यावर धाड टाकली. या कारवाईत 7 गोवंशांची सुटका करून त्यांना जीवनदान देण्यात आले. तर कत्तल करण्यात आलेल्या एका गोवंशाच्या मांसाची महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने कंपोस्ट डेपोवर विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर जीवनदान देण्यात आलेल्या गोवंशांना नांदगाव पेठ येथील गोरक्षण संस्थेत दाखल करण्यात आले. या प्रकरणात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई नागपुरी गेटचे ठाणेदार हनमंत उरूलागोंडावार, पोलीस निरीक्षक जर्नाधन साळुंखे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गजानन विधाते व पंकज गुप्ता, फुलचंद चंदेल, दिनेश नांदे, विनोद झाडे, दानिश इकबाल, राहुल रोडे, मोहन तायवाडे, इम्रान, किशोर, कुणाल, सचिन, आबिद, जाकीर यांनी केली.

# अज्ञात आजाराने लखाड येथील ३ वर्षिय चिमुकला दगावलां

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी ( दि.7 )**- तालुक्यातील लखाड येथील येथील हसनैन दानिश खान यांचा तीन वर्षाचा मुलगा अज्ञात आजाराने काल रात्री (दि.6) ला रात्री 12:39 दरम्यान अमरावती येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला, आणि अश्याच या आजाराचे आणखी दोन-तीन रुग्ण लखाड मध्ये असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सविस्तर वृत्त असे की, लखाड येथील हसनैन दानिश खान (वय ३) गेल्या पाच दिवसा अगोदर पोटात दुखु लागल्याने त्याला परतवाडा येथील खाजगी रुग्णालयात भरती केले, परंतु त्याचा



त्रास कमी न झाल्याने अश्यातच तो बेशुद्ध अवस्थेत गेला तेथील डॉक्टरांनी त्याला अमरावती येथे हलवले परंतु डॉक्टरांनी शर्थी चे प्रयत्न करूनही हसनैन चा जीव वाचवता आला नाही परंतु हा आजार कोणता याचा शोध डॉक्टरांना न लागल्याने आणि अश्याच प्रकारचे दोन तीन रुग्ण तीन चार वर्षाचे बाळ आजारी असल्याने ही नेमकी कोणती साथ तर नाही ना अशी भीती नागरिकां'या मनात लागली आहे .या संदर्भात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधिर डोंगरे यां'याशी संपर्क केला असता या आजाराची पूर्ण चौकशी करून नेमका आजार कोणता हे सांगण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# बसमध्ये चढताना महिलेजवळील ऐवज लांबविला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ,( दि.7 )**- बसमध्ये चढताना एका महिलेजवळील ऐवज लांबविण्यात आला. ही घटना परतवाडा ठाण्याच्या हद्दीत 6 फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली. एक 57 वर्षीय महिला ही भावाच्या मुलीच्या साक्षगंधाचा कार्यक्रम आटोपून नणंदेसोबत गावी जाण्याकरिता परतवाडा स्थानकावर आली. त्या दोघी बसमध्ये चढत होत्या. परंतु, प्रचंड गर्दी असल्याने त्या बसमध्ये बसल्या नाही. त्या स्थानकावर खुर्चीवर जावून बसल्या. त्यावेळी त्यांना त्यांच्याजवळील पर्सची चेन उघडी दिसली. पाहणी केल्यावर त्यातील ऐवज लंपास झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी त्यांनी परतवाडा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**अमरावती** - एका अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेण्यात आल्याची घटना 6 फेब्रुवारी रोजी चिखलदरा ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. एक मुलगी ही तिच्या आई-वडिलांना बाहेरून परतल्यावर घरी दिसून आली नाही. त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. नातेवाइकांकडे विचारणा करण्यात आली. मात्र, तिचा पत्ता लागला नाही. अशात तिला एकाने पळवून नेल्याचा संशय व्यक्त करीत कुटुंबीयांनी चिखलदरा ठाण्यात तक्रार दाखल केली. या घटनेचा पुढिल तपास चिखलदरा पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# काकू म्हणून आवाज देत चोरले मंगळसूत्र

- **अज्ञात दोन लुटारूविरुद्ध गुन्हा दाखल**
- **आशियाड कॉलनी येथील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 7 )** - काकू म्हणून आवाज देत एका महिलेच्या गळ्यातील 18 ग्रॅम सोन्याचे मंगसळसूत्र हिसकावून दोन लुटारूंनी पळ काढला. ही धक्कादायक घटना 6 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आशियाड कॉलनीत घडली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात दोन लुटारूंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

शहरातील रहिवासी एक महिला या त्यांच्या बहिणीच्या मुलीचा वाढदिवस असल्याने गुरुवारी सायंकाळी दुचाकीने आशियाड कॉलनी भागात गेल्या होत्या. सायंकाळच्या सुमारास त्या परिसरात आपली दुचाकी पार्क करीत होत्या. त्यावेळी एका लुटारूने त्यांना काकू म्हणून आवाज दिला. त्यामुळे महिलेने वर बघितले. त्याचवेळी काही कळण्यापूर्वीच लुटारूने त्यांच्या गळ्यातील 1 लाख 25 हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. महिलेने मदतीसाठी आरडाओरड केली. मात्र, दोन्ही लुटारू तेथून पळून जाण्यात यशस्वी झाले. त्यानंतर महिलेने घटनेची माहिती गाडगेनगर पोलिसांना दिली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात दोन लुटारूंविरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्यांचा कसून शोध सुरू आहे.

# बांधकाम कामगार संघटनेचे महाधरणे आंदोलन

### प्रलंबित योजनांच्या अंमलबजावणीची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.7 )**- मिहाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना (आयटक) च्या वतीने आज शुक्रवारी (दि.6) अमरावती कामगार उपायुक्त कार्यालयावर राज्यव्यापी महाधरणे आंदोलन करण्यात आले. प्रलंबित नोंदण्या, योजनांचे नितूनिकरण आणि कामगारांना लाभ मिळावा या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, बांधकाम कामगारांसाठी असलेल्या 32 योजनांचे लाभ अजूनही हजारो कामगारांपर्यंत पोहोचलेले नाहीत. अनेक कामगारांची नोंदणी आणि नुतनीकरण प्रक्रियाही रखडली आहे, त्यामुळे ते शासकीय सुविधांपासून वंचित राहिले आहेत. आंदोलनात सहभागी झालेल्या कामगारांनी आरोप केला की, निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणात सुरक्षा आणि गृह उपयोगी संच वाटण्यात आले. मात्र, तरीही लाखो कामगारांना या लाभापासून दूर ठेवण्यात आले. सर्व पात्र कामगारांना हे साहित्य वाटप करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जर सरकारने त्वरित उपाययोजना केल्या नाहीत, तर लवकरच आणखी मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशारा आयटक बांधकाम कामगार संघटनेचे राज्य सरचिटणीस संजय मंडावधरे यांनी दिला. यावेळी शेकडो कामगारांनी घोषणाबाजी करत शासनाच्या कामगार धोरणाविरोधात रोष व्यक्त केला.

# कन्नड येथे दिव्यांग बांधवाची शासनाला कंटाळून आत्महत्या

### प्रहार जनशक्ती पक्षाचा आरोप, जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )**- कन्नड येथे सरकारच्या उदासीन धोरणाला कंटाळून एका दिव्यांग व्यक्तीने आत्महत्या केल्याचे सांगत या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शुक्रवारी (दि.7) अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन केले.यावेळी सरकारच्या दिव्यांग धोरणांवर टीका करत, सरकारी योजना केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप करण्यात आला.

निवेदनानुसार, त्र्यंबक कडुजी धोत्रे (रा.कन्नड जिल्हा छ. संभाजीनगर) या दिव्यांग बांधवाला सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळाला नाही. या दिव्यांग बांधवाला नाहक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे त्यांनी स्वत:ची जीवन यात्रा संपविली असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे म्हणणे आहे.

दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये शेकडो वेळा चक्रा मारावे लागतात, मात्र तरीही त्यांना न्याय मिळत नाही, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे लक्ष न दिल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा देण्यात आला. दिव्यांगांच्या कल्याणासाठीच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून दिव्यांगांच्या न्यायासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रहार महानगर प्रमुख बंटी रामटेके, प्रदेश प्रवक्ते जितू दुधाने, अभिजित देशमुख, श्याम इंगळे, नंदकिशोर कुयटे, शेख अकबर, अभिजित गोंडाणे, मनीष पवार, योगेश कावरे, उमेश मेश्राम, अजय तायडे, नंदू वानखडे, कमलेश गुप्ता, चेतन गाडेकर, संगीता बोंडे, अतुल जयसिंगपुरे, पंकज सोनटक्के यांच्यासह अन्य पदाधिकारी, दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### या आहेत प्रमुख मागण्या

दिव्यांगांना संजय गांधी योजना अनुदान 6 हजार रुपये महिना तातडीने द्या, शासकीय जागा उपलब्ध करून विनाअट घरकुल द्या, अंत्योदय योजनेचा लाभ देण्यात यावा, जिल्ह्यातील दिव्यांगांना व्यवसायाकरीता शासन निर्णयाप्रमाणे 200 चौ. फुट जागा देण्यात यावी. अपंग वित्त विकास महामंडळाकडून वितरीत केलेले कर्ज माफ करण्यात यावे,जिल्ह्यामध्ये स्वयंरोजगारासाठी स्टॉल देण्याचे धोरण करण्यात यावे,दिव्यांगांचे खोटे प्रमाणपत्र आढळल्यास शासकीय नोकरी करणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची तपासणी करून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, आदि मागण्यात निवेदनात करण्यात आल्या.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**
**( महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम )**
**कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर**
**पंचायत समितीचे मागे, अचलपूर ( कॅम्प )**
**दुरध्वनी क्र. ०७२२३-२२१३२२** **ई-मेल :-eepmpd@gmail.com**

**निविदा सुचना क्र. १४/२०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या https://mwrdide.in/vide/home या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | खुली नविदा/सुक्षिशित बेरोजगार अभियंता/मजुर सहकारी संस्था | जिल्हा | निविदेची किंमत (रूपये लक्ष) |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९ गांवे पाणी पुरवठा योजने करीता M.S. Pipe. ओलांडवणीचे काम. | सुक्षिशित बेरोजगार अभियंता | अमरावती | ६.११ |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १०/०२/२०२५ ते १७/०२/२०२५
निविदा उघडण्याचा दिनांक : दिनांक २०/०२/२०२५
(लिफाफा क्र. १)

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपूर
जा.क्र. ३८१/मवलपाविअच./ले.शा/नि.लि./जाहिरात/नि.सु.क्र. १४/२०२५
दिनांक ०६/०२/२०२५

**कार्यकारी अभियंता**
**मध्यम व लघु पाटबंधारे विभाग,**
**अचलपूर**

**वि.मा.का./अम./जाहि./ ११२२/२०२४-२०२५**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# रेती तस्कराची नायब तहसीलदाराला धक्काबुक्की

## मोर्शी शहरातील घटना ■ पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि.7)** - मोर्शीचे नायब तहसीलदार आपल्या चमूसह अवैध वाळुची तपासणी करीत असताना एका वाळू तस्कराने त्यांना धक्काबुक्की केली. तर अन्य एका घटनेत एका अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने रस्त्यावर रेती टाकून पळ काढल्याची घटना 4 व 5 फेब्रुवारी रोजी मोर्शी शहरात घडली. या दोन्ही प्रकरणी मोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मोर्शी शहरात अवैध रेती तस्करी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. यावर आळा बसावा म्हणून मोर्शी तहसीलचे नायब तहसीलदार चारुदत्त पाटील हे आपल्या चमू सह शहरात अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व ट्रकची तपासणी (ता.4) करीत होते. दरम्यान नगर परिषदेच्या नवीन इमारती समोर एमएच 27 बी एक्स 9559 क्रमाकांचा अवैध वाळुचा ओव्हरलोड असलेला डम्पर तपासणी करीता थांबविला होता. यावेळी सदर वाहन अवैध गौण खनिज वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. दरम्यान तेथे शेख बशीर व 3 व्यक्ती आले. पाटील हे आपले शासकीय काम करीत असताना या व्यक्तींनी त्यांना धक्काबुक्की करून शासकीय कामात अळथळा निर्माण केला. या डंपर मध्ये 12 ब्रास अवैध रेती किंमत अंदाजे 60 हजार रुपये असल्याची तक्रार दिली. महसुल अधिकारी यांना धक्काबुक्की करून शासकिय कामात अळथळा निर्माण केल्याचा लेखी तक्रार मोर्शी पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आली. तसेच



अन्य एका घटनेत मंगळवारी (ता.4) पेठपुरा भागातील कृषी कॉलनी येथे नायब तहसीलदार चारुदत्त पाटील हे आपल्या चमुसह अवैध वाळुची तपासणी करीत होते. यावेळी एक एमएच 40 सीएच 1753 क्रमांकाच्या ट्रक्टरची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अवैध गौण खणिज वाहतुक करीत असल्याचे आढळून आहे. त्यास रॉयल्टी संदर्भात विचारणा केली असता त्याने त्या बाबत नकार दिला.

यावेळी त्यास तहसील कार्यालयात वाहन घेवुन चलण्यास सांगितले असता सदर आरोपीने रेती रस्त्याने खाली पाडुन ट्रॅक्टर व ट्रॉलीसह पळ काढला. यातील अनोळखी ट्रॅक्टर चालक आपले ताब्यातील ट्रक्टर मध्ये 1 ब्रास रेती किमत अंदाजे 6 हजार रुपये गौणखनीज चोरुन पळुन नेल्याची तक्रार नायब तहसीलदार चारुदत्त पाटील यांनी मोर्शी पोलिस स्टेशनला दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी 132,303,305 व इतर कलमा नुसार गुन्हा दाखल केला असून एका युवकाला अटक केली आहे.

# जिवे मारण्याची धमकी देऊन तरुणाला लुटले

## बारा हजारांचा मुद्देमाल हिसकाविला, कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.7)** एका तरुणाला जिवे मारण्याची धमकी देऊन मोबाइल व दोन हजार रुपये रोख असा 12 हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने हिसकावून नेण्यात आला. ही घटना 5 फेब्रुवारी रोजी रात्री कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील रॉयली प्लॉट ते खत्री कॉम्प्लेक्स दरम्यान घडली. या प्रकरणी तरुणाच्या तक्रारीवरून अज्ञात दोन लुटारूंविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील छत्री तलाव मार्गावरील रहिवासी दीपेश झांबानी (22) हा जवाहर गेट भागातील एका कापड दुकानात सेल्समन म्हणून काम करतो. एका ग्राहकाचे पार्सल पोहोचवून दुकानात परत येताना तो रॉयली प्लॉट भागातील महापालिकेच्या स्वच्छतागृहाजवळ लघुशंकेकरिता थांबला. तेथेच एका लुटारूने दीपेशला मला तुझ्यासोबत काम आहे, असे म्हणत त्याला आपल्या दुचाकीवर बसवून खत्री कॉम्प्लेक्स येथे नेले. त्या ठिकाणी दुसरा लुटारूसुद्धा होता. त्या दोघांनी दीपेशला जिवे मारण्याची धमकी देत त्याच्याकडील 10 हजार रुपये किमतीचा मोबाइल व 2 हजार रुपये रोख असा 12 हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून नेला. सदर घटनेनंतर दीपेशने कोतवाली पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# पेट्रोलमध्ये इथेनॉल चे प्रमाण वाढले

## जुन्या गाड्यांची इंजने जाम होण्याचा धोका

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि.7)**- शहरात काही दिवसांपासून पेट्रोल भरल्यानंतर दुचाकी व चार चाकीच्या इंजिनमध्ये बिघाड निर्माण होत आहे. त्यामुळे वाहनचालकांनी धास्ती घेतली असून हा पेट्रोलमधील इथेनॉलचे मिश्रण वाढविल्याचा परिणाम असल्याचे मेकॅनिकचे म्हणने आहे. तर बाहेरगावी जाणाऱ्या नागरिकांची गाडी अनेकवेळा बंद पडत् असल्याने त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

मोर्शी शहरात पेट्रोल भरल्यानंतर गाडी चालविताना अडचण येत आहे. सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी पेट्रोलमध्ये इथेनॉल चे मिश्रण 20 टक्के वाढविल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी प्रसारीत झाले होते. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण जास्त झाल्यामुळे जुन्या



बनावटीच्या गाडीचे इंजिन जाम होण्याची शक्यता बळावली आहे.त्यातच या पेट्रोलमध्ये पाण्याचे काही थेंब जरी मिसळले तरी त्याची जेली तयार होते,त्यामुळे गाडीचे इंजिन ब्लॉक होण्याची भीती आहे.त्यामुळे जुन्या बनावटीच्या वाहनांच्या टाकीमध्ये पाणी मिसळणार नाही याची शक्यता घेणे गरजेचे आहे.

शहरात पेट्रोल टाकल्यानंतर दुचाकी व चार चाकी मध्ये बिघाड होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे . याबाबत त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले.या निवेदनात त्यांनी म्हटले की,

सध्या मोर्शी शहरातील प्रत्येक पेट्रोल पंपावर मिळणाऱ्या पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण 20त्न पेक्षा जास्त असल्यामुळे दुचाकी किंवा चार चाकीच्या इंजिन मध्ये बिघाड होत असल्याकारणाने ग्राहकांना त्याचा प्रचंड मनस्ताप होत आहे. सोबतच अनेक वाहनांच्या इंजिनचे काम निघत असल्याने या वाहनचालकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड बसत आहे. याबाबत आपण तात्काळ चौकशी करावी अशी मागणी केली आहे. निवेदन देते वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष देव कुरवाडे, जनहित तालुकाध्यक्ष तुषार पोहकार, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा वाघमारे, हिरा भोसले, शिवा कपले, दीपक दाभोडे, सुजल नळकांडे, स्वामी आगरकर, जय अमझरे तसेच इतर पदाधिकारी हजर होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर केंद्रीय अर्थसंकल्पाची होळी

## ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनने केला निषेध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.7)**- केंद्रीय अर्थसंकल्पाची शुक्रवार (दि.7) ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होळी केली. केंद्र सरकारच्या विद्यार्थी आणि शिक्षण विरोधी धोरणांच्या निषेधार्थ ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या कार्यकर्त्यांनी अमरावती जिल्हा कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. केंद्रीय अर्थसंकल्पाची प्रतिकात्मक होळी करत घोषणाबाजी करण्यात आली. ढ्ढस्न्न कार्यकर्त्यांनी शिक्षणाच्या खाजगीकरणाचा निषेध करत, शिष्यवृत्ती आणि भत्यांमध्ये वाढ व्हावी, शिक्षक व कुलगुरूंच्या




नियुक्तीबाबत त्नष्ट मार्गदर्शक तत्त्वे मागे घेण्यात यावीत, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. AISF ने सरकारवर आरोप केला की 2025 चा केंद्रीय अर्थसंकल्प पूर्णपणे विद्यार्थीविरोधी असून, यात सरकारी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांचे खाजगीकरण वेगाने सुरू करण्याचा कट आहे. शिक्षण हे फक्त श्रीमंतांसाठी मर्यादित राहील आणि गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण स्वप्नवत होईल, अशी टीका करण्यात आली. तसेच, देशातील बेरोजगारीच्या गंभीर समस्येकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याने तरुणांचे भवितव्य अंधारात जात असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला.

आंदोलनामध्ये सिनेट सदस्य प्रा. कैलास चव्हाण, प्रतीक्षा ढोके, दीप सावळे, वेदांत कोल्हे, करण वानखडे, सुप्रिया राऊत, सागर दुर्योधन, सतीश पठाडे, वैष्णवी कडू आदींचा समावेश होता.

### शिक्षण पध्दती उध्वस्त करण्याचा डाव-

निवेदनानुसार, विद्यार्थी विरोधी भूमिकेला बळकटी देत भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पुन्हा एकदा भारतीय विद्यार्थ्यांच्या आशा आकांक्षांना बगल देणारा अर्थसंकल्प सादर केला आहे. शिक्षण क्षेत्राला बळकट करण्यासाठी ठोस उपाय योजनांचा अभाव असलेला हा अर्थसंकल्प आणखी एक अपयश आहे. वाटपातील सातत्यपूर्ण घट हे एक निश्चित वैशिष्ट्य आहे. यात मागील बजेटचे प्रतिबिंब असल्याचे संघटनेने म्हटले आहे. सार्वजनिक शिक्षणाला पद्धतशीरपणे उध्वस्त करण्याचा हा आरएसएस-भाजपचा अजेंडा असल्याचा आरोप देखील करण्यात आला.



# चिखलदऱ्यात महिलेचा विनयभंग

**अमरावती** - चिखलदरा परिसरात एका महिलेचा विनयभंग करण्यात आल्याची घटना 6 फेब्रुवारी रोजी घडली. एक 35 वर्षीय महिला ही चिखलदरा येथे फिरायला आली होती. त्या एका हॉटेलमध्ये मुक्कामी होत्या. त्या हॉटेलमध्ये झोपल्या असताना अमर रा. महेंद्र कॉलनी, अमरावती याने त्यांच्यासोबत असभ्य वर्तन करून त्यांचा विनयभंग केला. या प्रकरणी महिलेने चिखलदरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# उत्तम ब्राम्हणवाडे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार

## नवी दिल्ली येथे मीनाक्षी लेखी आणि रेचलेना यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.7)** - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण या राष्ट्रीय पुरस्काराचे आयोजन दरवर्षी करण्यात येत असते. यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंतांचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव दरवर्षी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात येतो, यामध्ये सन 2025 यावर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण पत्रकारिता पुरस्कार% हा अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील पत्रकार उत्तम ब्राह्मणवाडे यांना जाहिर करण्यात आला असून तो पुरस्कार ब्राह्मणवाडे यांना नवी दिल्ली येथील नविन महाराष्ट्र सदनाच्या सभागृहामध्ये झालेल्या भव्य अशा कार्यक्रमात बहाल करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि मेडल असे असून हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार माजी केंद्रीय मंत्री मिनाक्षी लेखी आणि अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्या सुश्री. डॉ.रेलचेना यांचे हस्ते बहाल करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला महाराष्ट्र, गोवा, बिहार, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, उडीसा, उत्तर प्रदेश आणि दक्षिण भारतातील विविध क्षेत्रातील व महाराष्ट्रासह अमरावती, नागपूर, यवतमाळ, वर्धा, अकोला बुलढाणा, ठाणे, मुंबई, पालघर, पुणे, औरंगाबाद चंद्रपूर, सोलापूर व आदी जिल्ह्यांतील पत्रकार तसेच सामाजिक शैक्षणिक, कला, साहित्य सांस्कृतिक उल्लेखनीय काम करणारे पुरस्कारार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारितेतून परिवर्तनचे काम केलेल्याना डॉ. बाबासाहेब आंबेडकर



राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी माजी केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी, अल्पसंख्याक सदस्य रेंचलना यांनी उपस्थित असलेल्या सर्व पुरस्कारार्थीना यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला यावेळी मंचावर दक्षिण भारतातील सिनेअभिनेत्री नुसरत जहाँ, प्रेरणा शर्मा भाटिया, किशोर मकवान, ठाकूर चंदनसिंग राष्ट्रीय अध्यक्ष प्रधान मुख्य सरपंच ठाकूर चदनसिह, मीनाक्षी प्रेरणा शर्मा आणि गुलशन खत्री आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.पत्रकार उत्तम ब्राम्हणवाडे याना यापूर्वी सुद्धा पत्रकारिता क्षेत्रातील अनेक पुरस्कार मिळाले असून सन 2021 चा गोवा येथील आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता पुरस्कार मिळालेला आहे. सन 2025 या वर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतभूषण राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल उत्तम ब्राम्हणवाडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सेवापूर्ती ही जीवनाची नवी आवृत्ती - मधुकरराव अभ्यंकर

## राजीव गांधी उच्च प्राथमिक शाळा वार्षिक उत्सव व सेवापुर्ती सोहळा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सूर्जी (दि. 7)**- कुंदाताई खेडकर यांनी शाळेला भरभरून प्रेम दिले 25 वर्ष सातत्याने विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कार्य करून आदर्श विद्यार्थी विद्यालयातून तयार केले. कोणत्याही नोकरीची सेवापूर्ती ही सेवानिवृत्ती नसून ती खऱ्या अर्थाने नव्याने जीवन जगण्याची नवी आवृत्ती असते, असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर यांनी सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त केले

राहुल व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित राजीव गांधी उच्च प्राथमिक शाळा येथे 26 जानेवारी व 27 जानेवारी ला दोन दिवसीय



वार्षिक उत्सव व सेवा पूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर संस्थेच्या संचालिका प्रा.शुभांगी अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसरातील महिला ,पालक वर्ग हळदी कुंकू चा कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महिलांची उखाणे , विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. 27 जानेवारी पालक मेळावा व विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका सौ. कुंदाताई खेडकर यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या जगामध्ये असे काही निर्माण होत नाही ज्याचा काहीही उपयोग नाही या जगात प्रत्येक वस्तूला, प्रत्येक प्राण्याला, प्रत्येक झाडाला महत्व असते. प्रत्येकामध्ये अलौकिक गुण असतो ज्याला हा गुण कळला तो जीवनात नक्कीच यशस्वी होतो. असे सकारात्मक विचार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या संचालिका प्रा.शुभांगी अभ्यंकर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. समाजभूषण श्री .मधुकरराव अभ्यंकर यांच्या हस्ते कुंदाताई खेडकर व श्री .मुरलीधर खेडकर यांचा शाल ,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची प्रास्ताविक मुकुंद चौधरी यांनी केले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव प्राचार्य गजानन वानखडे ,संजय शेटे ,गोपाल अभ्यंकर शाळा समिती सदस्या मंगलाताई वंजारी, मालती खाडे, वनमाला सोनोने, मंगला भडांगे, आशा चौधरी , परिसरातील नागरिक ,पालक वर्ग व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

> “माझ्या वडिलांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या या संस्थेत बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या अधिकाराचा योग्य तो उपयोग केला जातो. सर्व घटकातील विद्यार्थ्यांना समान वागणूक देऊन त्यांना अभिप्रेत असलेले शिक्षण सस्थेत दिले जाते.
>
> **क्षितिज अभ्यंकर**
> **अध्यक्ष**

कार्यक्रमाचे संचालन उज्वला वानखडे तर आभार प्रमोद भगत यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वी करिता कविता निचत ,रोहिणी एकलारे ,सरिता हरणे ,विजया सोनोने,नीलिमा गोरले, संतोष राठोड ,अतुल कोल्हे, वैशाली सदावर्ते, कल्पना येवले, निर्मला राऊत यांनी प्रयत्न केले.

# घरातून 64 हजारांचा मुद्देमाल चोरला

**अमरावती** - गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील मसानगंज येथील रहिवासी एका नागरिकाच्या घरातून 64 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला. ही घटना 6 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. मसानगंज येथील रहिवासी गोपाल गुप्ता (50) हे कुटुंबासह नागपूरला गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून रोख व अन्य साहित्य असा एकूण 64 हजारांचा मुद्देमाल लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर गोपाल गुप्ता यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली.

# स्नेहसमेलनातुन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो - भैय्यासाहेब पुसदेकर



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि. 7)** - विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तसेच सांस्कृतिक वारसा जपण्याकरीता भाषण,नृत्य,संगीत अभिनय,खेळ व क्रीडा अशा विविध कला गुणांना वाव मिळावा यासाठी स्नेहसमेलनाची गरज असते असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत उपाख्य भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर) यांनी केले.ते श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालीत श्री आर आर लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथे स्नेहसंमेलनाच्या उदघाटना प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी उद्घाटक म्हणून डॉ.प्रा. पंजाबराव पुंडकर, महात्मा फुले महाविद्यालय वरुड हे होते, तर अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत उपाख्य भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर) उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद नरहरपंत गावंडे, नानासाहेब ठाकरे, दिनेश अर्डक, वामनराव बिडकर, वामनराव भडके, प्रभाकरराव खोडस्कर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन.चौधरी डॉ.आतिष कोहळे, डॉ प्रा रवी धांडे, प्रा. विलास अंबाडकर, प्रा.डॉ.अश्विन लुंगे, विद्यार्थी प्रतिनिधी धनश्री साळवीकर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. पंजाबराव फुंडकर यांनी महात्मा फुले यांचे खरे वारसदार डॉ. पंजाबराव देशमुख या विषयावर व्याख्यान आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.जी एन चौधरी यांनी केले, तर संचालन प्रा. डॉ .रवी धांडे यांनी व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.अश्विन लुंगे यांनी केले.

स्नेहसंमेलना दरम्यान क्रिकेट, कॅरम, चेस, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन या खेळांचे तसेच पुष्प प्रदर्शनी,डिश डेकोरेशन, आनंद बाजार त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व त्यांना योग्य व्यासपीठ मिळावे यासाठी वक्तृत्व स्पर्धा,गीत गायन स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमांमध्ये विजयी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनाकरिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# दुध उतु घालणे झाले दुर्मीळ

## गावखेड्यातही प्रमाण झाले कमी

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि. 7)**- वसंत ऋतूच्या आगमनानंतर येणाऱ्या रथसप्तमीच्या दिवशी मोठ्या उत्साहात सूर्यपूजा केली जाते.रथसप्तमीलाच काही जण माघ सप्तमी, आरोग्य सप्तमी, माघ जयंती, अर्क सप्तमी, पुत्र सप्तमी अथवा सूर्य जयंती असंही म्हणतात. सूर्य हा भगवान विष्णूचा अवतार असल्यामुळे या दिवशी सूर्य नारायणाची पूजा केली जाते. तसेच दुध उतु घातल्या जाते.



मकर संक्रांतीला महिला हळदीकुंकवाचे वाण एकमेकींना देतात. हा समारंभ मकर संक्रातीपासून रथसप्तमीपर्यंत करण्याची पद्धत आहे. भारत हा विविध प्रकारच्या संस्कृतीने नटलेला देश आहे. मात्र भारतातील प्रत्येक धार्मिक विधीत अथवा संस्कृतीत निसर्गपूजा नक्कीच आढळून येत असल्याने गोधनपासुन मिळणाऱ्या शेणाच्या गोवरीचा कोळशांचा (विस्तव) आहारावर मकर संक्रांतीच्या दिवशी वापरल्या जाणाऱ्या सुगड्या लहान सगळ्यांमध्ये तांदूळ आणि दूध ठेवून हे त्या आहारावर म्हणजेच कोळशावर ठेवल्या जाते आणि ते या दिवशी मुद्दामून उतू घालतात हे शुभ असते आणि यातील भात हा लहान मुलांना मुख्यत्वे दिला जातो.

ग्रामीण भागातील कुमारीका, सुवासिनी प्रत्येक पौष रविवारी सुर्योदयापुर्वी अंगणातील तुळशीजवळ पुजा करतात. सदर पुजा पाटावर करुन दुधाने सुर्याची प्रतीमा काढून त्याचे पुजन करतात. पुजेच्या साहीत्यात बदाम, खारीक, सुपारी भुईमुंग शेंग, उसाचे पेर, बोरं, पेरु, गाजरांचा समावेश असतो. सर्वांनी दान करणे आवश्यक असल्याने रथसप्तमीला गोवरी पेटवुन त्यावर सुगड्यात दुध घातल्यावर तांदुळ पुजेसाठी वापरलेला सुका मेवा मिसळतात त्याचा प्रसाद शेजाऱ्या पाजाऱ्याना वाटतात. हल्लीच्या आधुनिक काळात दुध उतु घालणे क्वचीतच केल्या जात असल्याचे दिसुन येते.

पुराणात सांगितल्याप्रमाणे सूर्य देव सोन्याच्या रथातून प्रवास करतो ज्याला सात घोडे असून त्याचे सारथ्य अर्जुनाकडे असते. रथसप्तमीपासून सूर्यदेवाच्या उत्तरायणाला सुरूवात होते. सहाजिकच सूर्य नारायणाची उपासना करण्यासाठी रथसप्तमी साजरी केली जाते. शिवाय सूर्यदेवाच्या रथाला सात घोडे जोडलेले असल्यामुळे या सणाचे नाव रथ सप्तमी असं पडलं असण्याची शक्यता आहे. हा सण हिंदू धर्मामधील एक शुभ सण असून तो महाराष्ट्र आणि भारतातील काही राज्यांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.